| | |
|---|---|
| नि.फौ.ख.क्र. | ४१४१/२०२५ |
| सरकार -वि- करण | |
| निशाणी क्र. ०५ | |

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची शपथेवर सरतपासणी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | अरबाज अन्वर ईजाज अन्वर, |
| **वय** | : | २३ वर्षे, |
| **धंदा** | : | खाजगी व्यवसाय, |
| **राहणार** | : | गांजाखेत, नागपूर |

**सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती प्रियंका भा. झिरपे यांचेमार्फत-**

१. माझे अगरबत्ती बनविण्याचा व्यवसाय २ ते ३ वर्षांपासून गांजाखेत, गांधीबाग, नागपूर येथे आहे. दिनांक ०५.०५.२०२५ रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास मी एका रिसेप्शनला माझी मोटारसायकल काळया रंगाची पॅशन क्र. एमएच ४०-एएल-३०२४ ने भाटीया सेलीब्रेशन लॉन येथे माझा मित्र उज्रामसोबत गेलो होतो. मी रिसेप्शनला जाण्यासाठी माझी मोटारसायकल सदर सेलीब्रेशन लॉनसमोर पार्क केली होती. पार्क करतांना मी गाडीचे हॅन्डल लॉक केले होते. रात्री १.३० वाजता मी लॉनच्या बाहेर माझी गाडी पार्क केली होती त्याठिकाणी आलो. तर तिथे माझी गाडी मला दिसली नाही. मी आजुबाजुला माझी गाडी शोधली. दुसऱ्या दिवशी देखील शोधली परंतु मला माझी गाडी मिळून आली नाही. त्यानंतर मी दिनांक ०६.०५.२०२५ रोजी कळमना पोलीस स्टेशन येथे माझी गाडी चोरी झाल्याबाबत अज्ञात ईसमाविरुध्द फिर्याद दिली.

२. आता मला फिर्याद दिनांक ०६.०५.२०२५ दाखविण्यात आली, ती तीच आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी-१** देण्यात येते.

तसेच आता मला छापील प्रथम खबर दाखविण्यात आली. त्यावर सुध्दा माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी-२** देण्यात येते. पोलीसांकडून मला माझी गाडी सुप्रतनाम्यावर परत मिळाली. सदर गाडी आजही माझ्या ताब्यात आहे. पोलीसांनी मला सांगितले की, सदर गाडी शांतीनगर येथे लावारीस उभी होती. माझी गाडी कोणी चोरली होती की नाही याबाबत मला माहीत नाही. मी आरोपींना ओळखत नाही.

**उलट तपास आरोपीतर्फे आरोपीचे विद्वान विधीज्ञ प्राची गुप्ता यांचेमार्फत नाकारला.**

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास – नाही**
श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2025.12.22 16:40:24 +0530

( **अनामिका दे. बोस** )
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक २२.१२.२०२५